**राज्यातील ६ प्रादेशिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थां/तांत्रिक विद्यालयांमधील महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्राच्या ठिकाणी विदेशी भाषा प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे व त्यासाठीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : आयटीआय- २०२५/प्र.क्र. २४८/व्यशि-३**

दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ मार्च, २०२६

वाचा :- १. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शा.नि.ज्ञापन क्र. मंजूरी-२६११/२०२३/प्र.क्र.१३८/व्यशि-२, दि.१९.१.२०२४ रोजीची एकूण ६ ज्ञापने
२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र. ०७/सीटीएस/विदेशी भाषा/२०२५/६३१ दि. १७.११.२०२५

**प्रस्तावना :**

राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती व छत्रपती संभाजी नगर या विभाग स्तरावरील औद्योगिक प्रशिक्षण संस्थां/तांत्रिक विद्यालयांमध्ये महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्र (MIC) स्थापन करण्यास वाचा येथील दिनांक १९.१.२०२४ च्या ६ ज्ञापनान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. वाचा क्र. २ येथील संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या दिनांक १७.११.२०२५ च्या प्रस्तावानुसार उक्त ६ महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये विदेशी भाषा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे व सदरहू प्रशिक्षण केंद्रांमध्ये जर्मन, स्पॅनिश, जपानी, हिब्रू व कोरियन इत्यादी भाषांसाठी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. सदर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक संलग्नता, संबंधित देशाच्या भाषा विभागाकडून प्राप्त करून घेण्यात येणार आहे. त्यानुषंगाने विदेशी भाषा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास व त्यासाठी अंदाजित वार्षिक रु. १,९५,६०,०००/- एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालकांनी वाचा क्र. २ अन्वये शासनास सादर केला आहे.

त्याअनुषंगाने सदरहू विदेशी भाषा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास व त्यासाठी अंदाजित वार्षिक रु. १,९५,६०,०००/- एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती व छत्रपती संभाजी नगर या विभाग स्तरावरील ६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थां/तांत्रिक विद्यालयांमध्ये महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्र (MIC) स्थापन करण्यात येत आहेत. सदरहू ६ महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्रामध्ये विदेशी भाषा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास तसेच सदर प्रशिक्षण केंद्रांमध्ये गरजेनुसार विदेशी भाषांसाठी अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच उक्त् ६ विदेशी भाषा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी येणाऱ्या अंदाजित वार्षिक रु.१,९५,६०,०००/- एवढया आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. त्यामध्ये एकुण आवर्ती व अनावर्ती खर्च प्रति केंद्र रु. ३२,६०,०००/- असे एकूण ६ केंद्रासाठी एकुण अंदाजित रु.१,९५,६०,०००/- खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च सन २०२६-२७ या वित्तिय वर्षात मागणी क्र. झेडए-२, २२३०-कामगार व सेवायोजन, (०२) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण, (०२)(०८) प्रवेक्ष क्षमता वाढविण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा विस्तार करणे (२२३०ए२०९) (कार्यक्रम) या लेखाशिर्षांतर्गत १३-कार्यालयीन खर्च रु. १०९.२० लाख, १०-कंत्राटी सेवा रु. ८२.८० लाख, ०६-वीज, दूरध्वनी व पाणी रु. ३.६० लाख अशा प्रकारे एकूण रु. १९५.६० लाख या उदिष्टांतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात यावा.

३. शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दि.१७.४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उपविभाग-२, अनुक्रमांक-३, नियम क्र. २ व ७ अनुसार, उपविभाग दोन मधील अ.क्र. ८ मधील नियम क्र. १७ तसेच उपविभाग ४ मधील अ.क्र.११ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०३१३१७५६१९२३०३ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAROSE
MUNJA UMARAO

Digitally signed by BHAROSE MUNJA UMARAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=F3ABF3AB8B16DFEC487F18CE64D6B0AB8E38D8925D44D15F7DBD61BABB4AE6DF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B015B0D7AFAA0DB7C0603C5C954E6816492DBB5F94AB286DA7F224853A4EEBF, cn=BHAROSE MUNJA UMARAO
Date: 2026.03.13 17:57:24 +05'30'

**( मुं. उ. भरोसे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई

३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई / नाशिक /पुणे /औरंगाबाद / अमरावती/नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)

५. संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, ( व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत )

६. निवड नस्ती. (व्यशि-३).